क्रमांक:पोअवा/आस्था/PC TO ASI/गणवेष भत्ता/२०१९-२०/ 1851 /२०२०, वाशिम. दिनांक : 17 MAR 2020

मंजुर

# आदेश

मा.पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे यांचे आदेश क्रमांक पोमसं/१८/३०/२०१८-१९/गणवेष भत्ता अनुदान/५/२०१८, मुंबई. दि.०२/०८/२०१९, अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचाऱ्यांना गणवेष साहित्या ऐवजी गणवेष भत्ता वित्तीय वर्ष २०१९-२०२० करीता(१ एप्रिल, २०१९ ते ३१ मार्च, २०२० पर्यंत) प्रत्येकी रु.५,१६७/-(अक्षरी रुपये पाच हजार एकशे सदूसष्ट) इतका गणवेष अनुदान मा.पोलीस महासंचालक , म.रा.मुंबई यांचे परीपत्रक क्रमांक. पोमसं/१८/९० गणवेष अनुदान/४०/२०१२ मुंबई दिनांक ०४/०७/२०१६ मधील तरतुदीनुसार मंजुर करण्यात येत आहे.

१) गणवेष भत्ता वाटपाकरीता १ एप्रिल ते ३१ मार्च असे गटवर्ष आहे. त्या गटवर्षा मध्ये कोणत्याही महिन्यात नविन पोलीस शिपाई नियुक्त झाल्यास, त्या पोलीस शिपाईस नियुक्तीनंतर त्यांना रु.५१६७/-(अक्षरी रुपये पाच हजार एकशे सदूसष्ट)इतका गणवेष भत्ता देय राहील.

२) तसेच जे पोलीस कर्मचारी (पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक) जर निलंबीत असेल, तर निलंबीत कालावधीत सदर कर्मचारी यांना गणवेष परिधान करण्यास मनाई आहे. यास्तव त्यांना गणवेष भत्ता अनुदानातुन देण्यात येणार नाही. सदर कर्मचारी यांना जर पुन्हा सेवेत रुजु झाले आणि त्या दिनांकापासुन वित्तीय वर्ष पुर्ण होण्यास तिन महिन्यापेक्षा जास्त कालावधी असल्यास(०१ जानेवारी पुर्वी रुजु झाल्यास)अशा पोलीस कर्मचाऱ्यास त्या वित्तीय वर्षातील रु.५१६७/- इतका गणवेष भत्ता देय राहील. त्यापुढील कालावधीचा गणवेष भत्ता प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये नियमाप्रमाणे देय राहील.

३) सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना जर अभावित (Adhoc) पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली असेल, तर त्यांना मुळ पदाचा गणवेष भत्ता अनुज्ञेय राहील. तसेच एखाद्या वित्तीय वर्षात जर अभावित / तात्पुरती पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यास त्या पदाचा गणवेष भत्त देण्यात आला असेल आणि त्याच वित्तीय वर्षात त्यांची पदोन्नती संपुष्टात येवुन, त्यांना मागील पदावर (सपोउपनि) नियुक्ती देण्यात आलीस असेल तर एकाच वित्तीय वर्षात दुसरा गणवेष भत्ता देण्यात येवु नये. त्याचप्रमाणे जर एखाद्या वित्तीय वर्षात पोलीस कर्मचारी यांना सपोउपनि पदाचा गणवेष भत्ता देण्यात आला असेल, आणि त्यानंतर त्यांना त्याच वित्तीय वर्षात अभावित/तात्पुरती पोउपनि पदोन्नती देण्यात आला असेल, तर एकाच वित्तीय वर्षात पोउपनि पदाचा दुसरा गणवेष भत्ता देण्यात अनुज्ञेय राहणार नाही.

त्याचप्रमाणे जर एखाद्या वित्तीय वर्षात पोलीस कर्मचारी यांना स.पो.उप.नि. पदाचा गणवेष भत्ता देण्यात आला असेल, आणि त्यानंतर त्यांना वित्तिय वर्षात अभावित/ तात्पुरती पो.उप.नि.भत्ता देण्यात देण्यात आली असेल, तर एकाच वित्तीय वर्षा पो.उप.नि. पदाचा दुसरा गणवेष भत्ता अनुज्ञेय राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

४) वित्तीय वर्ष सुरु झाल्यापासुन (१ एप्रील) पुढील ३ महिन्याच्या आत (३० जुन पुर्वी) सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस कर्मचारी यांना त्या वित्तीय वर्षाचे गणवेष भत्या अनुज्ञेय नाही. माहे जुलै किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस कर्मचारी यांना फक्त त्या वित्तीय वर्षातील रु.५१६७/- इतका गणवेष भत्ता देय आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब.नं. | कर्मचा-यांचे नाव | नेमणुकीचा ठिकाण | कार्यालयीन माहिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सपोउपनि. | ८३१ | रजनीकांत देवराव अंभोरे | पोलीस मुख्यालय | |
| २ | पोशि. | १०१४ | अजय सुभाषराव महल्ले | पोस्टे.जउळका | |
| ३ | पोहवा. | ९६० | संजय विठठल आमटे | पोलीस मुख्यालय | |
| ४ | पोशि. | १०७७ | संदिप संखाराम दिंडे | पोलीस मुख्यालय | |
| ५ | पोशि. | १३४१ | देवानंद सुरेशराव कुरदवाड | पोलीस मुख्यालय | |
| ६ | पोशि. | १३६० | अमोल विलास काचेवाड | पोलीस मुख्यालय | |

२/- सदरचा खर्च गणवेष भत्ता अनुदान वित्तीय वर्ष २०१९-२० करीता मुख्य लेखाशिर्ष २०५५-पोलीस -(००) १०९ जिल्हा पोलीस (००) (००) (०१)-जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८) या उपलेखाशिर्षातर्गत "२५- पोषाख, राहुटी व भांडारे" या उद्दिष्टाखाली मंजूर शिल्लक अनुदान रु.२८०९२५/- मधुन रु.३१००२/-इतका खर्च भागविण्यात यावा.

३/- वर नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे वेतनाचे खाते मधे प्रत्येकी रु.५,१६७/-(अक्षरी रुपये पाच हजार एकशे सदूसष्ट) इतका गणवेष अनुदान वित्तीय वर्ष २०१९-२०२० करीता जमा करावा. तसेच जे पोलीस कर्मचारी प्रतिनियुक्तीवर आहे त्यांना त्यांचे गणवेष भत्ता-२०१९-२०२० त्यांचे प्रतिनियुक्तीचे ठिकाणी डिमांड डौप्टद्वारे किंवा त्यांचे वेतनाचे खाते मध्ये सदरची रक्कम जमा करुन त्याबाबतचा पुर्तता अहवाल उलट-टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

**टिप :- तसेच वर नमुद पोलीस कर्मचारी पैकी ज्या पोलीस कर्मचारीऱ्यांना या कार्यालयाकडून ०२ Cap+०१ Dress जो मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे वार्षिक निरीक्षकणाचे वेळी ज्यांना ज्यांना देण्यात आले आहे. त्यांची वसूली सदर रकमेतुन करुन उर्वरित रक्कम संबंधीतांना अदा करावी.**

( वसंत परदेशी )
भा.पो.से.,
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

आकस्मिक खर्च लिपीक(यांना दोन प्रतित)/रोखपाल/वेतन लिपीक पोलीस अधीक्षक, कार्यालय वाशिम.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना :-

सहायक लेखा अधिकारी/प्रमुख लिपीक लेखाशाखा /पत्रव्यहार शाखा/प्रबंधक/संगणक कक्ष/डिपीजी लिपीक पो.अ., कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष यांनी सदरचे आदेश सर्वा करीता पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संकेत स्थळावर सर्वाकरीता प्रसिध्द करुन दयावेत, तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणेदार, वाशिम जिल्हा / सर्व शाखा प्रभारी वाशिम जिल्हा/राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, वाशिम यांचे संकेत स्थळावर "ई-मेल" द्वारे त्वरीत कळवावे.

प्रत माहितीस (ई-मेल द्वारे) :-

२/- आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेले जे पोलीस कर्मचारी हजर असतील त्यांचा पैकी कोणत्याही कर्मचाऱ्यांचे नांव यादी मधुन सुटले असेल अशा कर्मचाऱ्यांचे नांव या कार्यालयास दोन दिवसाचे आंत न चुकता सादर करावा. तसेच जे पोलीस कर्मचारी निलंबित व कर्तव्यावर अनाधिकृत पणे गैरहजर /सिक मध्ये व दिनांक ३०-०६-२०१९ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत, अशा कर्मचाऱ्यांचे नांव यादी मध्ये आले असल्यास त्यांना सदरचे गणवेष भत्ता न देता तसा अहवाल उलट-टपाली या कार्यालयास त्वरीत कळविण्यात यावे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.